# ई - पोलीस पत्रिका

दि ०३/०१/२०२४ अनु.क्र.०३

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्तव तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोक सहभागातून साध्य करू.

# भाग-१

## पदोन्नती/बदली /प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/आस्था-५/अर्जित रजा/१३५३७/२०२३ अमरावती शहर दिनांक २६/१२/२०२३**

### आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ५० चे तरतुदीप्रमाने रजेवर सुटलेल्या दिनांकापासुन अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम /ब.नं. | नाव | नेमणुक | मागीतलेली अर्जित रजा | रजा मागण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | मपोशि/१११० | रुपाली निस्ताने | नियंत्रण कक्ष | १५ दिवस | ९ महिण्याचे गरोदर असल्याने |
| २ | मपोशि/९३२ | सोनाली मांडवकर | नागपुरी गेट | १५ दिवस | भाचीचे लग्न असल्याने |
| ३ | पोशि/१८२ | भुपेशचेद्र ठाकरे | गाडगेनगर | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |
| ४ | पोशि/१५३९ | निलेश चंदेल | फ्रेजरपुरा | १५ दिवस | बहिणीचे फॅमेली प्रॉब्लेमचे निमटारा करणे करीता |
| ५ | मपोना/१३८७ | पुजा नायर | शवाशा पश्चिम | १५ दिवस | धार्मिक कामा करीता |

वरील नमुद पोलीस अंमलदार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ५० चे तरतुदी प्रमाने रजेवर सुटलेल्या दिनांका पासुन अर्जित रजा उपभोगल्याचा अहवाल कार्यालयात सादर करावा.

# भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/निर्वाह भत्ता/सपोनि-राऊत + २/१५२९९/२०२३ अमरावती शहर दि.१५/१२/२०२३**

### आदेश

खालील नमुद अधिकारी/अंमलदार यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांना निलंबनाधिन राहुन तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक डीआरएस-१०८१/सि.आर.८७७/ एसईआर/ ०८ दिनांक १०/१२/१९८१ नुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (पदग्रहण अवधी, स्वियेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम ६८ (१) (अ) (एक) च्या तरतुदीनुसार ते सद्या घेत असलेल्या ५०% निर्वाह भत्त्यात २५% वाढ मंजुर

करण्यात येत आहे. सदर वाढीमुळे त्यांना एकत्रीत निर्वाह भत्ता ७५% देय राहणार असुन त्यांच्या निलंबनास ०३ महिने पुर्ण झाल्याच्या तारखे पासुन सदर निर्वाह भत्याची वाढ देय राहिल.

तसेच नमुद पोलीस अधिकारी/अंमलदार यांचा दैनंदिन गैरहजरचा कालावधी वगळुन निर्वाह भत्याची वाढ देय राहिल.

| **अ.क्र.** | **निलंबित अधिकारी/अंमलदार यांचे नाव व पदनाम / ब.नं.** | **निलंबित केल्याचा दिनांक** | **निलंबनातून मुक्त केल्याचा दिनांक** | **निलंबनास ३ महिने पुर्ण झाल्याचा दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १ | सपोनि/राहुलकुमार श्रीधर राऊत | २७/०६/२०२३ | ०५/१२/२०२३ | २६/०९/२०२३ |
| २ | पोहवा/६५० बाळू मधूकरराव भाकरे | ०२/०६/२०२३ | १३/१०/२०२३ | ०२/०९/२०२३ |
| ३ | पोहवा/६२५ पांडूरंग नारायण दंडारे | १३/०६/२०२३ | सद्या निलंबित | १३/०९/२०२३ |

**२.पोआअ/विचौ-१/अंतिम आदेश/पोहवा-६५० भाकरे/१५२९७/२०२३ अमरावती शहर**
**दिनांक १५/१२/२०२३**

## आदेश

**कसुरदाराचे नाव** :- पोहवा/६५० बाळू मधूकर भाकरे, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही कसूरदार पोहवा/६५० बाळू मधूकर भाकरे, नेमणूक - पो.स्टे. गाडगेनगर येथे नेमणूकीस असतांना तुम्ही दिनांक ०५/०३/२०२३ पासून कोणतीही पूर्वसूचना न देता कर्तव्यावरुन स्वमर्जीने गैरहजर राहील्याने तुमची प्राथमिक चौकशी केली असता, तुम्ही व्यसनाधिन असून कर्तव्यात कामचूकारपणा करणे, डयुटी संदर्भात वादविवाद करणे, पूर्णत: डयुटी न करणे, अनाधिकृतरित्या गैरहजर राहण्याच्या सवईचे असल्याबाबतचे वर्तन सिध्द झाले आहे.

तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून शिस्तप्रिय पोलीस खात्याला न शोभणारे वर्तन केले असून तुम्हास आपल्या कर्तव्याप्रती कोणतेही गांभीर्य नाही.प्रस्तूत प्रकरणी तुमची प्राथमिक चौकशी केली असता तुम्ही उपरोक्त प्रमाणे कसूरदार असल्याचे प्राथमिक चौकशीत सिध्द झाले आहे.तुमच्या अशा बेजबाबदार व बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तणाबाबत तुम्हास **देय वार्षीक वेतन वाढ २ (दोन ) वर्षाकरीता(अपरिणामकारक)का रोखण्यात येवु नये?**म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.सदर नोटीस तुम्ही दिनांक ०१/१०/२०२३ रोजी स्विकारली असून त्यावर तुम्ही दिनांक १७/११/२०२३ अन्वये लेखी स्पष्टीकरण सादर केले.तत्पूर्वी तुम्हास दिनांक १२/१२/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलावून तुमचे म्हणणे ऐकुण घेतले तुम्ही सादर केलेले स्पष्टीकरण व मौखीक म्हणणे यांचे अवलोकन केले असता ते पूर्णत: समाधानकारक दिसून आले नाही. परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यांत येत आहे.

### अंतिम आदेश

उपरोक्त कसुरीप्रकरणी पोहवा/६५० बाळू भाकरे, नेमणूक पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढील देय वार्षीक वेतन वाढ ०१ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक)**रोखण्याच्या शिक्षेचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे. उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाचे मार्फतीने अपिल अर्ज ०२ प्रतित सादर करु शकता.

**३.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ./पोहवा-६५० बाळू भाकरे/१५३०४/२०२३ अमरावती शहर दि.१५/१२/२०२३**

## आदेश

**संदर्भ :-** १)क्र. पोआअश/विचौ/निलंबन/पोहेकॉ/६५० बाळू भाकरे/६४०२/२०२३ , दि.०२/०६/२०२३
२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन मुक्त/पोहवा-६५० भाकरे+१/११४३५/२०२३ दि.१३/१०/२०२३

**विषय :-** निलंबन कालावधी तसेच गैरहजर कालावधी निश्चित करणे बाबत.

**--ooo--**

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये पोहवा/६५० बाळू भाकरे, नेमणूक पो.स्टे.गाडगेनगर, अमरावती शहर हे दिनांक ०५/०३/२०२३ पासून कोणतीही पूर्वसूचना न देता स्वमर्जीने कर्तव्यावरुन गैरहजर राहून बेशिस्तपणाचे वर्तन केले आहे. कर्तव्यावरुन दिर्घकाळ अनुपस्थित असल्यामुळे त्यांना दिनांक ०२/०६/२०२३ रोजी निलंबित करण्यांत आले होते व दिनांक १३/१०/२०२३ रोजी निलंबनातून मूक्त करण्यांत आले आहे.

तरी पोहवा/६५० बाळू भाकरे, यांचा **दिनांक ०५/०३/२०२३ पासून ते दिनांक ०१/०६/२०२३ पावेतो चा एकुण ८८ दिवस अनाधिकृत गैरहजर कालावधीहा** महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियक क्रमांक ६३ (६) चे तरतुदीनूसार **असाधारण रजा(विनावेतन रजा)** मंजूर करण्यांत येत आहे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७० (१) नुसार पोहवा/६५० बाळू भाकरे, नेमणूक पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर यांचा **दिनांक ०२/०६/२०२३ ते दिनांक १३/१०/२०२३ पावेतो निलंबन कालावधी हा(As Such)"जसाचे तसा"** करण्यात येत आहे.

**४.पोआअ/विचौ-१/निलंबन कालावधी/पोहवा-९९९ गणेश मेशकर/१५२९८/२०२३ अम दि.- १५/१२/२०२३**

**संदर्भ :-** प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. ४), अमरावती यांचे नि.फौ. ख.क्र. ९९३/२००९ न्यायनिर्णय पत्र दिनांक - १५/०७/२०१० अन्वये

**विषय :- निलंबन कालावधी निश्चित होणेबाबत.**

oooo

पोहवा/९९९ गणेश नथ्थुजी मेशकर, नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर हे पो.स्टे. खोलापूरी गेट, अमरावती शहर येथे नेमणूकीस असतांना त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा येथे अप.क्र. ५७/०९ कलम ४९८ (अ), ३४ ५०६ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल झाला होता. पोहवा/९९९ गणेश नथ्थुजी मेशकर, यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक - विचौली/निलंबन/गणेश-९९९/२६६/२००९ अमरावती दिनांक २१/०७/२००९ अन्वये निलंबीत करण्यांत येवून आदेश क्रमांक विचौली/निलंबन मुक्त/पोशि गणेश - ९९९/३६३/२००९ दिनांक २४/०९/२००९ अन्वये निलंबनातून मुक्त करण्यांत आले.

सदर प्रकरणाचा दिनांक १५/०७/२०२० रोजी सदर गुन्हयाचा निकाल लागला असून वि. न्यायालयाने त्यांची निर्दोष मुक्तता केली असल्याने त्यांचा दिनांक २१/०७/२००९ ते २४/०९/२००९ पावेतोचा निलंबन कालावधी बाबत खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

## आदेश

पोहवा/९९९ गणेश नथ्थुजी मेशकर, नेमणूक - पोलीस मुख्यालय, अमरावती शहर यांचा दिनांक २१/०७/२००९ ते दिनांक २४/०९/२००९ पावेतोचा निलंबन कालावधी हा म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (३) (४) तरतूदीनूसार "**सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ**" म्हणुन गणण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/आस्था-१/अवलंबित सदस्य नोंद/१३४०९/२०२३ दि.२९/१२/२०२३ अमरावती शहर**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर आस्थापने वरील खालील नमुद पोलीस अमंलदार यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांचेवर पुर्णपणे अवलंबून असलेले कुटूंबातील सदस्यांच्या नावाची नोंद वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रयोजनार्थ सेवापटात नोंदविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अंमलदाराचे नांव, पदनाम व ब.क्र. | नेमणूक | कुटूंबातील अवलंबित सदस्याचे नांव व अंमलदाराशी नाते |
|---|---|---|---|
| १. | पोशि/६७४, अश्विन गणेशराव भुस्कवडे | पो.स्टे. गाडगेनगर | वडील- गणेशराव ना.भुस्कवडे, वय-६५ वर्ष<br>आई- सुमन ग.भुस्कवडे, वय-५६ वर्ष |
| २. | मपोशि/३६०, अर्चना ज्ञानदेव राठोड | पो.स्टे. बडनेरा | सासरे- कैलास किसन चव्हाण, वय-६०<br>सासू- शोभा कैलास चव्हाण, वय-५८ |

महिला पोलीस अंमलदारांचे बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.वैखप्र-२०२२/प्र.क्र.१७५/राकावि-२, दिनांक १४.१२.२०२२ व मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२८/४९३७/मपोकुआयो/२२/२०२२, दिनांक ०३.०५.२०२३ मधील (अ) ते (ड) अन्वये विवाहीत महिला शासकीय कर्मचाऱ्याने तिचे **आई-वडील किंवा सासू-सासरे या दोघांपैकी एकाचीच** वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीचा लाभ घेण्याकरीता निवड करता येते. त्यामुळे **वर नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीसाठी निवड केलेल्या वरील अवलंबित सदस्यांच्या नावात त्यांचे सेवाकालावधीत कसलाही बदल करता येणार नाही.** तसेच वर नमुद पोलीस अंमलदार यांनी विनंती अर्जात नमुद केलेली माहिती खोटी, चुकीची अथवा दिशाभुल करणारी असल्याचे निदर्शनास आल्यास ते प्रचलित नियमानुसार शिस्तभंगविषयक कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

**(सागर पाटील)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस